शासकीय कर्मचा-यां [illegible] 3

हृदयावरील शस्त्रक्रिया, मुत्रपिंड रोपण रक्ताचा कर्करोग व बायपास कारोनरी शस्त्रक्रियेसाठी अग्रीम मंजूर करणे.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग.
निर्णय क्रमांक- एमएजी १०८३/४११९/पीएच ९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक २१ .८.१९८५.

वाचा- १] शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक एमएजी-१०८३/ ४११९/पीएच ९अ, दिनांक २७.८.१९८४.

२] शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक एमएजी-१०८४/ ४१५७/ सीआर १५६/पीएच ९अ, दिनांक २९.४.१९८५.

निर्णय/- शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक एमएजी- १०८३/४११९/ पीएच ९अ, दिनांक २७.८.१९८४ नुसार शासकिय कर्मचा-यांस हृदयावरील शस्त्रक्रियेसाठी तसेच मुत्रपिंड रोपणासाठी लागणारी किंमती उपकरणे व औषधे खरेदी करण्यासाठी रु.१०,०००/- च्या कमाल मर्यादेपर्यंत अग्रीम मंजूर करण्यात येत होते अग्रीमाची ही मर्यादा वाढविण्याबद्दल अनेक सुचना आलेल्या आहेत.

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी १०८४/४१५७/ सीआर १५६/पीएच९अ, दिनांक २९.४.१९८५ नुसार चार विनिर्दिष्ट रोगांबाबत शासकीय रुग्णालयात अद्यावत अशी व्यवस्था उपलब्ध नसल्यामुळे कांही विशिष्ट खाजगी रुग्णालयांत वैद्यकीय उपचार करुन घेण्यास परवानगी देण्यांत आली असून त्यासाठीच्या संपूर्ण खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय समजण्यात आली आहे.

त्यामुळे या सर्वच रोगांवरील वैद्यकिय उपचारांसाठी अग्रीम मंजुर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासन निर्णय क्रमांक एमएजी १०८३/४११९/पीएच ९अ, दिनांक २७.८.१९८४ नुसार मंजूर करण्यांत आलेले पूर्वीचे आदेश रद्द करुन शासन आता असे आदेश देत आहे की हे अग्रीम खालील चार आजारांच्या उपकरणांची खरेदी, ~~४५,०००/- च्या कमाल मर्यादेपर्यंतच्या रकमेइतके~~ किंमती औषधे व औषधोपचार यावरील संभाव्य खर्च अथवा रुपये ४५,०००/- च्या कमाल मर्यादेपर्यंतच्या रकमेइतके मंजूर करण्यात येईल.

१] हृदयावरील शस्त्रक्रिया[हार्ट सर्जरी]
२] मुत्रपिंड रोपण[किडनी ट्रान्सप्लन्टेशन]
३] रक्ताचा कर्करोग [ब्लड कॅन्सर]
४] बायपास-कारोनरी सर्जरी.

कृ.मा.प.

३. हे अग्रीम मंजूर करण्याबद्दलचे सर्वसाधारण नियम ह्या निर्णयासोबतच परिशिष्टामध्ये दिले आहेत.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या संमतीने त्यांचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक सीआर५५७-८५-सेवा-५, दिनांक २७.६.८५ नुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

[गु. वि. तिरोडकर]
उप सचिव.

शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक: एमएजी १०८३/ ४११९/ पीएच ९ दिनांक: २१/८/८५ चे परिशिष्ट.

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

नियम क्रमांक : [अ] महाराष्ट्र राज्य सेवा [ वैद्यकीय परिचर्या] नियम १९६१ अनुसार जे शासकीय कर्मचारी वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्यास पात्र आहेत अशा शासकीय कर्मचा-यांना हे अ्रीम मंजूर करण्यांत येईल.

[ब] अस्थायी शासकीय कर्मचा-यांना दोन स्थायी कर्मचा-यांचा जामीन देणे आवश्यक आहे.

[क] जर पती पत्नी दोघही शासकीय कर्मचारी असतील तर अग्रीम दोघापैकी एकालाच मंजूर करण्यांत येईल.

नियम क्रमांक : २ - हे अग्रीम फक्त महाराष्ट्र राज्य सेवा [ वैद्यकीय परिचर्या] नियम १९६१ अनुसार प्रतिपूर्ती मिळणा-या उपकरणांच्या व शासन निर्णय दिनांक २९.४.८५ च्या तरतुदीनुसार ज्या उपकरणाच्या खरेदीवरील व औषधोपचारावरील खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय असेल तेव्हाच मंजूर करण्यांत येईल.

नियम - ३ : शासकिय कर्मचा-याने आपल्या अग्रीमाच्या अर्जासोबत उपकरणांची खरेदी, किंमती औषधे व औषोपचार यासाठी लागणारा संभाव्य खर्च व शस्त्रक्रियेची आवश्यकता दर्शविणारे शासकीय रुग्णालयाचे अथवा शासन निर्णय दिनांक २९.४.१९८५ अन्वये मान्यता देण्यात आलेल्या रुग्णालयाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

नियम-४ हे अग्रीम ४५,०००/- रु.च्या कमाल मर्यादेपर्यंत अथवा उपकरणांची खरेदी किंमती औषधे व औषधोपचार यावरील संभाव्य खर्च यापैकी जे कमी असेल त्या रकमेपर्यंत मंजूर करण्यात येईल .

नियम-५-ज्या कारणासाठी हे अग्रीम मंजूर झाले आहे., त्याचे कारणासाठी ते उपयोगात आणले गेले आहे हे पाहण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखाची राहील.

नियम-६- [अ] अग्रीम मंजूर झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या कालावधीत वसूल करण्यात येईल अथवा शासकीय कर्मचा-यांस देय असलेल्या वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या रकमेतून वसूल करण्यांत येईल.

[ब] जर अग्रीमाची संपूर्ण रक्कम वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या देयकामधून वसूल होण्यासारखी नसेल तर उरलेली रक्कम शासकीय कर्मचा-याच्या वेतनातून अथवा इतर देय रकमेतून एकाच हप्त्यात वसूल करण्यात येईल.

नियम-७- अग्रीम मंजूर झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वसूल झाले नाही तर त्यावर घरबांधणी अग्रीमासाठी आदेय (admissible) असलेल्या व्याजाच्या कमीत कमी दराने व्याज आकारण्यात येईल.

नियम:८ - वरील नियमांनुसार अग्रीम मंजूर करण्याचे अधिकार महाराष्ट्र नागरी सेवा [ सेवेच्या सर्वसामान्य शर्थी ] नियम १९८१ च्या परिशिष्ट २ मध्ये नमूद केलेल्या विभागीय प्रमुखांना राहातील.

[ प्रभाकर भगरे ]
कार्यासन अधिकारी.